# वेदना

दिधली शिकस्त त्याने ठरवून वेदनांना
जपले मनात पुन्हा जगवून वेदनांना
त्याचे प्रयत्न सारे पडलेत तोकडे का?
देतात काय कोणी भरवून वेदनांना
डोळ्यांत दाटलेले अश्रूत भारले अन्
त्यानेच मात केली सजवून वेदनांना
डोळ्यात साठवूनी सारेच दुःख त्याने
सुख घेतले जरासे सुखवून वेदनांना
थांबे नदी जिथे ती वळणावरी जराशी
तीर्थात घेत मीही भिजवून वेदनांना
आक्रोश ऐकताना थरकाप होत आहे
ते ठेवती कशाला थिजवून वेदनांना
संघर्ष रोजचा हा प्रत्येक भावनांचा
जिंकून घेत सागर हरवून वेदनांना

-----------------------------

खपलीस वेदनेच्या कळ बाधली जराशी
दुःखास भोगलेल्या झळ लागली जराशी

---------------------------

डोळ्यांत त्या तुझ्या मी पाहून भाव घेतो
प्रेमात बंधनाच्या विसरून नाव घेतो

- प्रकाश क्षीरसागर